माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**क्र. रामाआ नागपूर/तक्रार क्रमांक: ४८१/२०२३/नागपूर**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. भाष्कर महादेवजी सुरकर, रा. रामपुरी वार्ड पवनी, ता. पवनी, जि. भंडारा | लेखापाल, नगरपरिषद लाखांदूर, जि.भंडारा | मुख्याधिकारी, नगरपरिषद लाखांदूर, जि.भंडारा |

**सुनावणी दिनांक ११.११.२०२४**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार दिनांक २८.१२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यानुषंगाने सदर तक्रारीवर आज दिनांक ११.११.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, श्री. प्रलय पडगेपवार उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्यातर्फे श्री. मेश्राम, करनिर्धारण अधिकारी व श्री. झेनिथ कानेकर, नगर रचना सहा. नगर परिषद, पवनी उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार द्वितीय अपील अर्ज दाखल न करता जोडपत्र-अ नुसार मागितलेली माहिती अप्राप्त आहे, असे कारण नमुद करुन कलम १८(१) नुसार थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांत त्यांनी दिनांक २०.०६.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी, नगरपरिषद लाखांदूर, जि.भंडारा यांच्याकडे प्रपत्र-अ नुसार सन २०२१ ते माहिती प्राप्त होईपर्यंत नगरपंचायत लाखांदूरला शासनातर्फे खासदार निधी, आमदार निधी व इतर निधी मध्ये प्राप्त झालेला निधी व खर्चाची माहिती (लेखा जोखा) याबाबत माहितीची मागणी केली आहे. सदर अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, नगर परिषद पवनी यांनी दिनांक ३०.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये आमदार निधी, १४ फाईल्स व खासदार निधी ५ फाईल्सची माहिती एकुण १०४५ पाने असून ५० पानाची माहती मोफत असून उर्वरित ९९५ पानाचे रु.२/- प्रमाणे रु.१९९०/- जमा करुन माहिती कार्यालयाकडून प्राप्त करावी, असे कळविले. त्यानंतर अपीलार्थी यांनी दिनांक २६.०७.२०२३ रोजी जोडपत्र- ब नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे “माहिती अप्राप्त” असे कारण नमुद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यानुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०६.०९.२०२३ रोजी सदर प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेणेबाबत कळविले असल्यामुळे अपील अर्ज निकाली काढले आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी, जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर माहिती नाकारली असल्याने त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती करण्यात यावी, फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, विभागीय चौकशीची कारवाई करण्यात यावी. तसेच



राज्य माहिती आयोग खंडपीठ

तक्रारकर्त्यास झालेल्या मानसिक व शारिरिक, आर्थिक नुकसान भरपाई मिळण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही खुप विस्तृत स्वरुपाची असल्याने व कार्यालयात कामाचा व्याप असल्यामुळे अर्जदार यांना सदर माहिती अभिलेखातून प्राप्त करुन घेण्याकरीता कळविले होते. तथापि, अपीलार्थी यांनी सदर माहिती प्राप्त करुन घेतलेली नाही. त्यानंतर नगरपंचायत, लाखांदूर पत्र क्र. नपंला/कावि/३९२/२०२३, दि. १२.०७.२०२३ अन्वये तक्रारकर्ता यांना एकुण १५ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपील अर्ज निकाली काढलेले आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेल्या शुल्कावरुन माहिती अर्ज बघितल्यास सदर माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी वेळेत शुल्क कळविल्याचे पत्र निर्गमित केलेले आहे. तक्रारकर्ता यांनी शुल्क भरले नसल्याने प्रथम अपील दाखल पात्र होत नाही. माहितीचा कालावधी सन २०२१ पासून ते माहिती प्राप्त होईपर्यंत असा नमुद आहे. तसेच तक्रारकर्ता यांना सन २०२१ च्या कोणत्या तारखेपासून माहिती हवी आहे, याचा स्पष्ट उल्लेख केला नाही. सबब, सदरचा अर्ज मोघम आहे.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे द्वितीय अपील दाखल न करता दिनांक २८.१२.२०२३ रोजी थेट तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारीमध्ये जेथे मा. आयोगाला उद्देशून माहिती अर्जाचा कोणताही दिनांक नमुद केला नाही व माहिती देण्याची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत थेट तक्रारीमध्ये खाली नमुद मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे माहिती देण्याचे आदेश पारीत करता येणार नाही.

**In the case of Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर तक्रारीत माहिती देण्याचे आदेश पारीत करता येणार नाही. वरील निष्कर्षामुळे तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई व इतर आदेश देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग * नागपूर *

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक: ११.११.२०२४**

**जा.क्र.** 9013 **दि.** 31 DEC 2024

E:\SA \तक्रार क्र. 481-2023-श्री. भास्कर गुरकर